FILENAME ashok word document ८


जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

काटा रोड वाशिम

दूरध्वी ०७२५२-२३३६५३/२३४२३८ फॅक्स ०७२५२-२३२८५८

ईमेल : rdc_washim@rediffmail.com वेबसाईट http://www.washim.nic.in


---

कक्ष क्र.३ रालोनों/कावि-८८६/२०१६ दिनांक -८ /९/२०१६

## जाहीर ई-निविदा सुचना

वाशिम जिल्हयातील राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावतीकरण करण्याच्या दुस-या टप्यातील कामाची माहिती संगणक प्रणालीवर नोंदणी करण्याचा कार्यक्रम केंद्रशासनाने निश्चीत केला असुन चार्ज अधिकारी तथा तहसिलदार व मुख्याधिकारी यांच्या स्तरावर एनपिआर डाटा ऑनलाईन करण्यासाठी तहसिल कार्यालय व मुख्याधिकारी यांच्या स्तरावर एनपीआर डाटा ऑनलाईन करण्यासाठी तहसिल कार्यालय वाशिम, मालेगाव,रिसोड,मंगरुळपिर,मानोरा व कारंजा तसेच नगर परीषद वाशिम, रिसोड, मंगरुळपिर, कारंजा या क्षेत्रातील एनपिआर बुकलेटमधील माहिती संगणक सॉफ्टवेअर मध्ये नोंदणीचे काम ९० दिवसाच्या कालमर्यादेत पुर्ण करावयाचे आहे त्या करीता ईच्छुक निवीदा धारकाकडुन ई निवीदा मागवीण्यात येत आहेत.ई-निवीदेचा तपसिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | संगणक प्रणालीमध्ये प्रती व्यक्ती डाटा ऐन्ट्रीसाठी शासनाने निश्चित केलेले कमाल मर्यादा दर | अंदाजे व्यक्ती संख्या |
|---|---|---|---|
| | Npr नोंदवहीतील माहिती संगणक प्रणालीवर नोंदणी करण्याकरीता माहिती नोंदकार (Data Entry Operators) उपलब्ध करुन देणे संगणक प्रणालीमध्ये माहितीची नोंदणी करणे ऑनलाईन अपलोड करणे व (Validation) वैधतीकरण करणे तसेच पायाभूत सुविधांची उभारणी अणि मांडणी व इतर बाबी. | | |
| १ | मुळ लोकसंख्या व नव्याने आढळुन आलेली लोकसंख्या या बाबतची माहिती | रु.३.८० | ११७८७६४ |
| २ | बाहय स्थलांतरीत व मृत व्यक्तीच्या संदर्भातील माहिती | रु.०.८० | १२३६६७ |

ई- निवीदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| ऑनलाईन ई-निवीदा फॉर्म ची कींमत | रुपये ३०००/- (अक्षरी-रुपये तिन हजार फक्त) प्रती निवीदेचा ऑनलाईन पध्दतीने निवीदा फॉर्म मिळेल |
| ई-निवीदा विक्री / डाउनलोड करण्याचा दिनांक | दिनांक ९/९/२०१६ सकाळी १०.०० ते दिनांक १५/९/२०१६ सायं ५.०० वाजेपर्यंत |
| अनामत रक्कम | रुपये ५०,०००/- (अक्षरी -पन्नास हजार रुपये फक्त) |
| ई-निवीदा ऑनलाईन भरण्याची अंतीम तारीख | दिनांक १५/९/२०१६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निवीदा लिफाफा क्र.१ व २ उघडण्याचा संभाव्य दिनांक व स्थळ | दिनांक १६/९/२०१६ रोजी दुपारी १.००वाजता जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे. |

अधिक माहितीसाठी सदर ई-निवीदा सुचनाबाबतची माहिती http://www.mahatenders.gov.in व http://www.washim.nic.in या संकेतस्तळावर उपलब्ध आहे.

O/C जिल्हाधिकारी वाशिम

राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावतीकरण करण्याच्या दुस-या टप्प्यातील मुळ लोकसंख्या व नव्याने आढळुन आलेली लोकसंख्या याबाबतची माहिती तसेच बाहय स्थलांतरीत व मृत व्यक्तीच्या संदर्भातील माहिती संगणक प्रणालीवर नोंदणी करण्याचा कार्यक्रम केंद्र शासनाने निश्चीत केला असुन चार्ज अधिकारी तथा तहसिलदार व मुख्याधिकारी यांच्या स्तरावर एनपीआर डाटा ऑनलाईन करण्यासाठी तहसिल कार्यालय वाशिम,मालेगाव,रिसोड,मंगरुळपिर,मानोरा व कारंजा तसेच नगर परीषद वाशिम,रिसोड,मंगरुळपिर,कारंजा या क्षेत्रातील एनपिआर बुकलेटमधील माहिती संगणक सॉफ्टवेअर मध्ये नोंदणीचे काम ९० दिवसाचे आत पुर्ण करावयाचे आहे.त्या करीता ईच्छुक निवीदाधारकांकडुन ई निवीदा मागवीण्यात येत असुन त्या करीता ई निवीदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

## ई - निविदा सन २०१६-१७

### अटी व शर्ती

१.रु.३०००/- (अक्षरी -रुपये तिन हजार फक्त) प्रती निविदेचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यानंतर http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळवर ऑनलाईन पध्दतीने ई निवीदा फॉर्म मिळेल.सदर रक्कम परत मिळणार नाही.

२.निवीदा दोन संच लिफाफा पध्दतीने भरावी लागेल त्या पैकी लिफाफा क्र.१ तांत्रीक बाबींचा असुन त्यातील आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणा-या निवीदा धारकांचे बाबतीत दराबाबतचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल लिफाफा क्र.१ तांत्रीक लिफाफ्यातील बाबींची पुर्तता न करणा-या निवीदा धारकांचा दराबाबतचा लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही.

३.तांत्रीक लिफाफा क्रमांक १ मधिल खालील बाबी सबंधीत पुर्ण माहिती कागदपत्रासह सादर करावी.

१.रुपये ३,०००/- (अक्षरी -रुपये तिन हजार फक्त) प्रती निवीदेची किंमत असेल व ती ऑनलाईन पध्दतीने भरावी.त्या बाबतची पावती स्कॅन करुन अपलोड करावी

२.रुपये ५०,०००/- (अक्षरी-पन्नास हजार रुपये फक्त) अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी.त्या बाबतची पावती स्कॅन करुन अपलोड करावी.

३.डाटा ऐन्ट्री संदर्भात कामाचा अनुभव असल्याबाबत प्रमाणपत्राची स्कॅन कापी अपलोड करावी.

४. आयकर भरल्याबाबतचे अदयावत प्रमाणपत्र व भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्याबाबत अदयावत प्रमाणपत्राची स्कॅनकापी अपलोड करावी.

५.भागीदारी संस्था असल्यास सहायक निबंधक भागीदारी संस्था यांचेकडे नोंदणी केल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत निवीदा भरणारी संस्था सहकारी संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र,उपविधी (बायलॉज) तसेच संस्थेकडे उपलब्ध खेळते भांडवल,सबंधीत संस्थेच्या बँक पासबुकाची साक्षांकीत प्रत व संस्थेचा मागील २ वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल ईत्यादीची स्कॅनकॉपी अपलोड करावी.

६.निवीदा धारकाने दयावयाचे प्रमाणपत्र "लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रे परीपुर्ण नसतील तर लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही म्हणजेच ई निवीदा नामंजुर करण्यात येईल,याची मला जाणीव असुन हे मला मान्य आहे "सदर प्रमाणपत्राची स्कॅनकापी अपलोड करावी.

७.जे दरपत्रक निवीदाधारक संस्था / एजन्सीने सादर केले असेल त्यावर सर्व भागीदारानी किंवा जर कोणी भागीदार गैरहजर असेल तर त्या ज्या व्यक्ती कायदेशीर मुक्त्यारपत्रधारक असतील अशा व्यक्तींनी सहमीत देणे आवश्यक आहे तसेच भागीदारी संस्था हि नोंदणीकृत असल्याबाबत सहायक निबंधक भागीदारी संस्था यांची नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत अपलोड करावी.

८.अनामत रक्कम भरण्यापासुन ज्यांना सुट असेल त्यांनी सुट असल्याबाबत आवश्यक कागदपत्रांची स्कॅन कॉपी अपलोड करावी अन्यथा सबंधीतास अपात्र ठरवीण्यात येईल.

४.निवीदा धारकाने लिफाफा क्रमांक २ मध्ये ऑनलाईन पध्दतीने दर पत्रकाच्या विहीत नमुण्यातच दर नमुद करणे आवश्यक आहे.

५.लिफाफा क्र.२ मधिल दरपत्रकात नमुद दोन्ही बाबीसाठी स्वतंत्रपणे दर नमुद करावे लागतील ज्या निवीदा धारकांचा ज्या बाबीसाठी कमी दर नमुद केला असेल  त्याचा दर स्वीकारण्यात येईल अथवा या बाबत शासनाला फायदेशीर ठरणारा दर स्वीकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

६.दोन किंवा दोनपेक्षा जास्त निवीदाधारकांनी समान दर नमुद केल्यास व ते न्युनतम असल्यास वाटाघाटी अंती जो निवीदा धारक कमी दराने काम करण्यास तयार होईल त्यास निवीदा मंजुर केल्या जातील याबाबत चा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

७.सदर ई निवेदेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

८.कोणतीही ई- निवीदा पुर्णपणे किंवा त्यानिवीदेचा काही भाग स्विकारणे अगर नामंजुर करणे या बाबतचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

९.निवीदा धारकास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास अथवा काळ्या यादीत टाकल्याचे घोषीत केले असल्यास किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वत: किंवा त्याचे नातेवाईकाचे नावाने निवीदा भरु नये अशा निवीदाधारकांना देण्यात आलेले कंत्राट रदद करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१०.निवीदा मंजुर झाल्यानंतर निवीदाधारकाने ३ दिवसात स्वत:चा पासफोर्ट फोटो साक्षांकीत करुन १०० रु चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

११.निवीदाधारकास कार्यरंभ आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ३ दिवसात राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावतीकरण करण्याच्या दुस-या टप्यातील मुळ लोकसंख्या व नव्याने आढळुन आलेली लोकसंख्या याबाबतच्या माहिती तसेच बाहय स्थलांतरीत व मृत व्यक्तीच्या संदर्भातील माहिती संगणक प्रणालीवर नोंदणी करण्याच्या कार्यक्रमानुसार केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे सर्व चार्ज स्तरावर प्रत्यक्ष कामास सुरुवात करणे बंधनकारक राहील या कामात कसुर झाल्यास प्रती दिन रु.२,०००/- (रुपये दोन हजार) दंड आकारण्यास निवीदाधारक पात्र राहील.

१२.निवीदाधारकास अदा करण्यात येणा-या देयकातुन शासन नियमानुसार आयकर व त्यावरील सरचार्ज,व्हॅट,सेल्सटॅक्स ई.कराची कपात करण्यात येईल.

१३.निवीदा उघडण्याची प्रक्रीया सुरु असतेवळी एखादया निवीदा धारकाने दाखल केलेली ई -निवीदा काही कारणास्तव उघडण्यात येउ नये अशी विनंती अथवा लेखी अर्ज सादर केल्यास संबंधीत निवीदाधारकाने निवीदेसोबत जमा केलेली अनामत रक्कमेचे डिपॉझीट जप्त करण्यात येईल तसेच सदर निवीदा अस्विकृत करुन कार्यालयात जमा करण्यात येईल.

१४.निवीदा धारकाने करार नाम्यातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास त्याची पुर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात यईल.

१५.तसेच एनपिआर बुकलेटमधिल माहीती संगणक सॉफ्टवेअरवर नोंदणीचे प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यापासुन ९० दिवसाच्या कालमर्यादेत ऑनलाईन करणे बंधनकारक राहील.

१६.केंद्रशासनाने निश्चीत केल्याप्रमाणे राज्यामध्ये एकाच वेळी कामाचा कालावधी ठरवुन दिल्याप्रमाणे प्रत्येक माहिती नोंदकाराने (प्रत्येकी १ ऑपरेटरने) प्रती दिन २०० व त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या माहितीची नोंदणी करणे बंधनकारक राहील या कालावधीत काम पुर्ण करुन ऑनलाईन अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

१७.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सीने शासकीय अटी व शर्तीची पुर्तता करुन पायाभूत सुविधा जसे संगणक उपलब्ध करणे,त्याची योग्य मांडणी करणे तसेच त्यामध्ये शासनाने दिलेले एनपिआर चे साफटवेअर टाकणे व पासवर्ड ची गोपनियता ठेवणे ईत्यादी बाबी बंधनकारक राहील.

१८.निवीदाअंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सीने चार्जनिहाय (तालुका,नगरपालीका,नगरपरीषद) सदर काम ९० दिवसात पुर्ण करण्याकरीता आवश्यक मनुष्यबळ डाटा ऐन्ट्री ऑपरेटरची यादी,पायाभूत सुविधा जसे संगणक उपलब्ध करणे,त्याची योग्य जोडणी, मांडणी या संदर्भातील माहिती करारनामा करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

१९.निवीदाधारकावर प्रत्यक्ष डाटा ऐन्ट्री करण्यासाठी चार्जनिहाय ऑपरेटर नियुक्तीचे ठिकाण व चार्जनिहाय ऑपरेटरची संख्या निश्चित करणे बंधनकारक राहील.

२०.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सीने सदर कामासाठी लागणारे ईंटरनेट कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन घेणे तसेच ती अखंड राहील व ती विस्कळीत झाल्यास पुन्हा जोडण्याची जबाबदारी तसेच सर्व संगणकावरील एनपिआर डेटा सुरक्षीत ठेवण्याची जबाबदारी सदर निवीदाधारकावर राहील.

२१.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सी यांना व नियुक्त केलेले नोंदणीकार (डाटा ऐन्ट्री ऑपरेटर) यांना जिल्हास्तरावरील प्रशिक्षण शासनाने निश्चीत केलेल्या कालावधीतच घेणे बंधनकारक राहील.

२२.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सीने खालील प्रमाणे तांत्रीक निकषानुसार काम करणे आवश्यक आहे.

२३.मुळ लोकसंख्या व नव्याने आढळुन आलेली लोकसंख्या या संदर्भातील माहितीची संगणक प्रणालीमध्ये नोंदणी करण्याकरीता खर्च मर्यादा प्रतीव्यक्ती रु.३.८० तसेच बाहय स्थलांतरीत व मृत व्यक्तीच्या नोंदणी करण्याकरीता (डाटा ऐन्ट्री) कमाल खर्च मर्यादा रु.०.८० असे दर शासनाने निश्चित केलेले आहेत.

२४.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सी यांना सदर कामासाठी अग्रीम दिले जाणार नाही.

२५.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सी यांना काम पुर्ण करुन अंतीम अहवाल तयार झाल्याखेरीज देयक अदा केल्या जाणार नाही.

२६.निवीदा अंतीम झालेल्या निवीदाधारक संस्था/एजन्सीला निवीदाधारकास Labour Welfare Fund,Insurance बाबत माहिती सादर करावी लागेल.

२७.वरील अटी व शर्ती मध्ये फेरबदल करण्याचा तसेच काही नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा अथवा शिथील करण्याचा तसेच कोणतेही कारण न देता एकतर्फी निवीदा नामंजुर करण्याचा व करारनामा संपुष्टात आणण्याचा अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे राखुण ठेवण्यात आला आहे. तो निवीदाधारक संस्था/एजन्सी यांना बंधणकारक असेल.काही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी वाशिम यांचा निर्णय अंतीम राहील.

२८.सदर निवीदेबाबत निवीदा धारक न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा हि वाशिम जिल्हा मर्यादीत असेल.

जिल्हाधिकारी वाशिम

जिल्हाधिकारी कर्यालय,वाशिम

(जनगणना विभाग)

वाशिम जिल्हयातील राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावती करण करण्याच्या दुस-या टप्प्यातील कामाची माहिती संगणक प्रणालीवर नोंदणी करण्याचा कार्यक्रम केंद्र शासनाने निश्चित केला असुन चार्ज अधिकारी तथा तहसिलदार व मुख्याधिकारी न.प. यांच्या स्तरावर एनपिआर डाटा ऑनलाईन करण्यासाठी तहसिल कार्या वाशिम, मालेगांव, रिसोड, मंगरुळपिर, मानोरा,कारंजा व नगर परिषद वाशिम,रिसोड,मंगरुळपिर,कारंजा या क्षेत्रातील एनपिआर बुकलेट मधील मुळ लोकसंख्या व नव्याने आढळुन आलेली लोकसंख्या या संदर्भातील तसेच बाहय स्थलांतरीत व मृत व्यक्तीच्या संदर्भातील माहिती संगणक सॉफ्टवेअर मध्ये नोंदणीचे काम ९० दिवसाच्या कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी.

ई - निविदा सन २०१६

लिफाफा अ मध्ये नमुद करावयाचा तपशिल

| अ.क्र | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचे संपुर्ण नाव | |
| २ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचे संपुर्ण पत्ता | |
| ३ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचा आधार कार्ड व त्यांचा क्रमांक | |
| ४ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचा पॅनकार्ड व क्रमांक | |
| ५ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचा रजिस्ट्रेशन व त्याचा क्रमांक | |
| ६ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचे मागील वर्षी आयकर भरल्याबाबतचे विवरणपत्र | |
| ७ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचे टॅन क्रमांक व त्याची प्रत | |
| ८ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचे निवडणुक ओळखपत्र. | |
| ९ | निवीदाधारक संस्था / एजन्सीने रु.३०००/- (रु.तिन हजार फक्त) ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरल्याची पावती | |
| १० | निवीदाधारक संस्था / एजन्सीने रु.५००००/- (रु.पन्नास हजार फक्त) ऑनलाईन पध्दतीने अनामत रक्कम भरल्याची पावती. | |
| ११ | निवीदाधारक संस्था / एजन्सीचे कामाच्या अनुभव प्रमाणपत्राची प्रत. | |
| १२ | निवीदाधारक संस्था / एजन्सीने आयकर भरल्याबाबतचे अदयावत प्रमाणपत्र. | |
| १३ | निवीदाधारक संस्था/ एजन्सी यांचे भागीदारी संस्था असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र. (छायांकीत प्रत जोडावी) | |
| १४ | सदर निवीदेकरीता निवीदाधारकाचे Upload केलेली कागदपत्र खरी असल्याबाबतचे स्वघोषणापत्र | |
| १५ | निवीदाधारक संस्था / एजन्सीने लिफाफा क्र १ मधील सर्व कागदपत्रे व्यवस्थीतपणे पुर्ण नसतील तर लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही म्हणजेच ती निवीदा नामंजुर करण्यात येईल याची मला जाणीव असुन ते मला मान्य आहे याबाबत प्रमाणपत्राची प्रत. | |

टिप :- निवीदेतील अटी / शर्ती मी वाचल्या असुन त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन मला बंधनकारक आहेत.करीता खालील स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

निवीदाधारक संस्था /एजन्सी ची सही -----

निवीदाधारक संस्था /एजन्सी चे नाव -------

निवीदाधारक संस्था /एजन्सीचा पत्ता -------

# निवीदा फॉर्म क्रमांक- २

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम (स्थानिक निधी विभाग) NPR Data Entry करण्यासाठी सिलबंद निवीदेमध्ये दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे दरपत्रकाची माहिती देत आहे.

१. निवीदा धारकाचे /फर्मचे नाव व पत्ता -----------------------------------------------------

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रती व्यक्ती डाटा ऐन्ट्री दर रुपये व पैसे |
|---|---|---|
| | Npr नोंदवहीतील माहिती संगणक प्रणालीवर नोंदणी करण्याकरीता माहिती नोंदकार (Data Entry Operators) उपलब्ध करुन देणे संगणक प्रणालीमध्ये माहितीची नोंदणी करणे ऑनलाईन अपलोड करणे व (Validation) वैधतीकरण करणे तसेच पायाभूत सुविधांची उभारणी अणि मांडणी व इतर बाबी. | -- |
| १ | मुळ लोकसंख्या व नव्याने आढळुन आलेली लोकसंख्या या बाबतचे दर | |
| २ | बाहय स्थलांतरीत व मृत व्यक्तीच्या संदर्भातील माहिती बाबतचे दर | |

टिप :- निवीदेतील अटि व शर्ती मी वाचल्या असुन त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन मला बंधनकारक आहे. करिता खाली स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :- निवीदा धारकाचा सही ----------

ठिकाण :- निवीदा धारकाचे नाव -----------

फर्म चे नाव व पत्ता -------------

प्रति,

जिल्हाधिकारी वाशिम

मी याव्दारे जिल्हाधिकारी वाशिम (स्थानिक निधी विभाग) या कार्यालयास NPR Software मध्ये माहिती भरण्यासाठी /Data Entry करणेसाठी वाशिम जिल्हयातील सर्व तालुक्यातील प्राप्त झालेल्या सर्व व्यक्तींची माहिती Online भरणे / Data Entry करणेसाठी मराठी,इंग्रजी भाषेचा टंकलेखनाचा अनुभव असलेला डाटा एंन्ट्री ऑपरेटर प्रत्येक तालुका / जिल्हा निहाय पुरवीणे कामी व डाटा अपलोड करणे कामी सोबत जोडल्याप्रमाणे व्यापारी व तांत्रीक लिफाफयात माझी निवीदा सादर करीत आहे.

निवीदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यास मी बांधील आहे.

<u>प्रतिज्ञापत्र</u>

मी याव्दारे प्रतिज्ञा करतो की, मी सादर केलेली निवीदा मंजुर झाल्यास निवीदेतील कामकाज मी उच्च गुणवत्तेने व दिलेल्या मुदतीत पार पाडेन व या कामासाठी आवश्यक मनुष्यबळ,उपलब्ध करुन देईन.तसेच मी निवीदेव्दारे जे शासकीय काम देणेत येईल व सबंधीत कागदपत्रे देण्यात येतील त्याबाबत पुर्णतः गुप्ततेची हमी घेत आहे. डाटा एंन्ट्री ऑपरेटरची संख्या व कालावधी हा जिल्हाधिकारी वाशिम यांचे सुचनेनुसार राहील.माझी अभिकर्ता म्हणुन निवीदा मंजुर असली तरीही डाटा एंन्ट्री Npr Software मध्ये सॉफ्टवेअरचे काम दिलेल्या वेळेत पुर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.मा.जिल्हाधिकारी (स्थानिक निधी विभाग) वाशिम यांचे लेखी सुचनेनुसार काम करणे बंधनकारक राहील तसेच स्वीकृत केलेल्या निवीदेचा अंतीम दर हा मा.जिल्हाधिकारी वाशिम यांच्या मान्यतेस अधिन राहुन व त्यांनी मंजुर केलेला दर मला मान्य राहील.

मला हयाबाबत पुर्ण कल्पना आहे की, माझ्या कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर / दिरंगाई झाल्यास जिल्हाधिकारी निश्चित करतील अशा दंडास मी पात्र राहीन.

निवीदा धारकाची स्वाक्षरी

१.निवीदा ज्यांकडुन दाखल करण्यात आल्या त्या संस्था / उदयोगाचे नाव - व पत्ता-

२.निवीदा धारकाचे संपुर्ण नाव व पत्ता-

मोबाईल क्रमांक-

साक्षीदार-

१.------------------------------------ रा.--------------------- (स्वाक्षरी)--------------------

२.------------------------------------ रा.--------------------- (स्वाक्षरी)--------------------

स्वघोषणापत्र

मी --------------------------------------- रा.------------------------------ वय------------

सत्यप्रतिज्ञेवर लिहुन देतो की,जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम (स्थानिक निधी शाखा) या कार्यालयाची राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावत करण्यासाठी (NPR) सॉफ्टवेअर मध्ये डाटा एन्ट्री करण्यासाठी संगणक संच, डाटा ऐन्ट्री ऑपरेटर्ससह ऑनलाईन सॉफ्टवेअरमध्ये नोंदणी करण्यासाठी ई- निवीदा सुचना सन २०१६ करिता------------------------------------------------ या फर्मने निवीदा सादर केलेली असुन सदर निवीदेकरीता मी www.mahatenders.gov.in या ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड केलेले तसेच कार्यालयास सिलबंद पाकीटामध्ये निवीदेसोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे / माहिती खरी असुन सदर कागदपत्रे व माहिती खोटी आढल्यास भा.द.वि.कलम १९९,२०० अन्वये मी शिक्षेस पात्र राहील.

ठिकाण:- वाशिम

दिनांक:- / /२०१६

स्वघोषणापत्र करणाराची सही व नाव

साक्षीदाराची सही -------------------------------------------

नाव -----------------------------------------------------

पत्ता -----------------------------------------------------